**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्यात शिष्टमंडळस्तरीय चर्चा /द्विपक्षीय संबंध विशेष धोरणात्मक भागीदारीत रुपांतरित करण्याचा निर्णय

- सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्तो-दौलिदेस भारत दौऱ्यावर /मुंबईत आयोजित बिझनेस फोरममधे उद्या सहभागी होणार

- महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातल्या परिवर्तनाचं नेतृत्व करायला तयार असून राज्यात गुंतवणूक करण्याचं मुख्यमंत्र्यांचं अमेरिकी कंपन्यांना आवाहन

- जातगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- रुपयाचं मूल्य प्रति डॉलर ९६ रुपये ८३ पैशांच्या नीचांकी पातळीवर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या प्रधानमंत्री **जॉर्जिया मेलोनी** यांच्याशी आज रोम इथं शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. विविध क्षेत्रात भारत आणि इटली यांच्यातले संबंध अधिक बळकट करण्याविषयी यावेळी चर्चा झाली. व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि धोरणात्मक भागीदारी हे मुद्दे या बैठकीच्या केंद्रस्थानी होते. यावेळी दोन्ही नेत्यांनी विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली.

चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. भारत आणि इटलीने आपले द्विपक्षीय संबंध विशेष धोरणात्मक भागीदारीत रुपांतरित करण्याचा निर्णय घेतल्याचं मोदी यांनी यावेळी जाहीर केलं. भारत आणि इटली

संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा २०२५-२९ मधे व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट निश्चित केली असल्याचं ते म्हणाले. भारत-इटली संरक्षण उद्योग रोडमॅपनं लष्करी सामुग्रीच्या उत्पादनाचा मार्ग मोकळा झाला आहे, असं त्यांनी सांगितलं…

**(होल्ड बाईट मोदी २९ सेकंद)**

इटली डिझाईन आणि काटेकोरपणासाठी ओळखलं जातं तर भारत क्षमता आणि नवोन्मेषासाठी ओळखला जातो, त्यामुळे दोन्ही देशांचं सामर्थ्य एकवटून संपूर्ण मानवजातीसाठी काम करू, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. भारत आणि इटली यांच्यातले संबंध परस्पराबद्दल आदर आणि विश्वासावर आधारलेले आहेत, असं इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी म्हणाल्या.

**<><><><><>**

सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष **निकोस ख्रिस्तो-दौलिदेस** आजपासून भारत दौऱ्यावर आहेत. आज संध्याकाळी त्यांचं मुंबईच्या छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालं. राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यांच्याबरोबरच्या शिष्टमंडळात सायप्रसचे परराष्ट्रव्यवहारमंत्री **कॉन्स्टँ/टिनोस/कोम्बोस** तसंच इतर वरिष्ठ अधिकारी आणि उद्योगजगताचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

पुढच्या वर्षी फेब्रुवारीत भारत सायप्रस राजनैतिक संबंधाना ६५ वर्षं पूर्ण होत आहेत, तसंच युरोपीय संघाचं अध्यक्षपद सध्या सायप्रसकडे असल्यानं या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झालं आहे.

**ख्रिस्तो-दौलिदेस** या दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांची भेट घेतील. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात सहकार्य बळकट

करण्याबाबत दोन्ही देशात चर्चा होईल. मुंबईत आयोजित बिझनेस फोरममधे उद्या ते सहभागी होतील.

**<><><><><>**

महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातल्या परिवर्तनाचं नेतृत्व करायला तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. ते आज “यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया” अंतर्गत आयोजित अणुऊर्जा आणि अमेरिका-भारत धोरणात्मक भागिदारी परिषदेत बोलत होते.

भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध आता तंत्रज्ञान, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांत अधिक मजबूत होत आहेत. नागरी अणुऊर्जा सहकार्य हे या भागीदारीच्या पुढच्या टप्प्यातलं निर्णायक क्षेत्र ठरू शकतं, असंही ते म्हणाले. अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत आहेत असं मुख्यमंत्र्यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं....

- **(- होल्ड- बाईट देवेंद्र फडनवीस-३५ सेकंद) - - -**

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणाऱ्या नवीन विकसित भारत जीरामजी योजनेची अंमलबजावणी येत्या१ जुलैपासून करण्यात येणार आहे. केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाने आज संसदीय समितीसमोर त्याबाबतचं सादरीकरण केलं. देशातल्या २५ राज्यांनी या कार्यक्रमासाठीची तरतूद आधीच केली असल्याची माहिती त्यात दिली.

**<><><><><>**

आगामी जनगणनेदरम्यान जातगणना करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली.

सरकारला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मागासवर्गीय लोकसंख्या नेमकी माहीत असणं गरजेचं आहे, असं मत प्रदर्शित करत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालच्या  पीठानं सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला.

<><><><>

जागतिक बाजारात आज तेलाच्या दरात घसरण झाली. कच्च्या तेलाचा दर २ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी खाली येऊन १०८ डॉलर ७ सेन्ट्स प्रति बॅरेल झाला. परकीय चलन बाजारात रुपयाचं ३० पैशांनी अवमूल्यन झालं आणि त्यानं प्रति डॉलर ९६ रुपये ८३ पैसे इतकी नीचांकी पातळी गाठली.

<><><><>

भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून इराण युद्धासारखी अनिश्चित परिस्थिती असूनही यंदा ६ पूर्णांक ४ दशांश टक्के विकासदर राखू शकेल, असा अंदाज संयुक्त राष्ट्रांचे वरिष्ठ अर्थतज्ञ इंगो पिट्टरले यांनी वर्तवला आहे. जगाची आर्थिक स्थिती आणि प्रगती अहवाल याविषयी ते बातमीदारांशी बोलत होते. यंदा जीडीपीमध्ये किंचित घट झाली तरी पुढच्या वर्षी भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा उसळी घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

आठ प्रमुख उद्योगांच्या एकत्रित निर्देशांकात यावर्षी एप्रिलमध्ये १ पूर्णांक ७ टक्क्यांपर्यंत वाढ झाली, जी मार्चमधील १ पूर्णांक २ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जारी  केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या महिन्यात वार्षिक आधारावर सिमेंट उत्पादनात ९पूर्णंक ४ टक्के, पोलाद उत्पादनात ६ पूर्णांक २ टक्के आणि वीज निर्मितीत ४ पूर्णांक १ टक्क्यांनी वाढ झाली.

मात्र, कोळसा उत्पादनात ८ पूर्णांक ७ टक्के, खत उत्पादनात ८ पूर्णांक ६ टक्के, नैसर्गिक वायू उत्पादनात ४ पूर्णांक ३ टक्के, कच्च्या तेलाच्या उत्पादनात ३

पूर्णांक ९ टक्के आणि पेट्रोलियम रिफायनरी उत्पादनांच्या उत्पादनात अर्ध्या टक्क्याने घट झाली. औद्योगिक उत्पादन निर्देशांकात समाविष्ट असलेल्या वस्तूंच्या उत्पादनात आठ प्रमुख उद्योगांचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकात्याच्या इडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु आहे. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ७ षटकात ४ बाद ५० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अमरावती इथं ४६ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांच्या पार्थिवावर आज हरिद्वार इथं शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आज खांडुरी यांच्या पार्थिवाचं दर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

**//<><><><><>//**